आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१६  मे २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं नेदरलँड्समधे जल्लोषात स्वागत

- लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांचा पाकिस्तानला कठोर शब्दात  इशारा

- पेट्रोलवरच्या निर्यात शुल्कात ३ रुपये वाढ तर डिझेल आणि विमान इंधनावरच्या निर्यात शुल्कात कपात

- जनगणना २०२७ साठी गृहगणनेचा दुसरा टप्पा महाराष्ट्रासह ४ राज्यात सुरु

**आणि**

- थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत  सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीचा अंतिम फेरीत प्रवेश

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सध्या पाच देशांच्या दौऱ्यावर असून, काल ते नेदरलँड्समध्ये दाखल झाले. नेदरलँड्समधे ॲमस्टरडॅम विमानतळावर डच परराष्ट्र व्यवहार मंत्री टॉम बेरेन्सडेन यांनी त्यांचं स्वागत केलं. द हेग इथं प्रधानमंत्र्यांना डच सेनादलांनी पारंपरिक पद्धतीनं मानवंदना दिली. नेदरलँड्समधल्या भारतीय समुदायानं त्यांचं जल्लोषात स्वागत केलं.

**- - - होल्ड- बाईट- जल्लोष - - - -**

या दौऱ्यात प्रधानमंत्री मोदी नेदरलँड्सचे प्रधानमंत्री रॅब जेटेन यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा करतील तसंच नेदरलँड्सच्या राजघराण्यातल्या मान्यवरांना देखील प्रधानमंत्री भेटणार आहेत. ते आज भारतीय समुदायाला संबोधित करतील तसंच आघाडीच्या डच कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची भेट घेतील. या दौऱ्यात उभय देशांमधे सेमीकंडक्टर चिप्स आणि एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रांमध्ये अनेक महत्त्वाचे करार होण्याची शक्यता आहे. या क्षेत्रात नेदरलँड्स जागतिक स्तरावर आघाडीवर असून भारताचा प्रमुख आर्थिक भागीदार आहे. भारतात ३०० हून अधिक डच कंपन्या कार्यरत असून जल व्यवस्थापन,

नवीकरणीय ऊर्जा, हरित जलविद्युत अर्थव्यवस्था, कृषी तंत्रज्ञान आणि आरोग्य या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमध्ये मजबूत भागीदारी आणि सहकार्य आहे.

<><><><><>

पाकिस्तानने भारतविरोधी कारवाया तात्काळ थांबवल्या नाहीत तर गंभीर परिणाम भोगावे लागतील, त्यांनी हे तात्काळ थांबवायचं आहे की नामशेष व्हायचं आहे हे त्यांनी ठरवावं अशा कठोर शब्दात लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यानी पाकिस्तानला इशारा दिला आहे. नवी दिल्ली इथं सेना संवाद या कार्यक्रमात ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूरसारखी परिस्थिती पुन्हा उद्भवली तर भारतीय लष्कर कशी प्रतिक्रिया देईल, असा प्रश्न द्विवेदी यांना विचारण्यात आला होता, त्यावर त्यांनी हे उत्तर दिलं. पाकिस्तानने दहशतवादाला पोसणं आणि भारताविरोधात कारवाया करणं थांबवावं, असं द्विवेदी म्हणाले.

- **- - होल्ड बाईट द्विवेदी- - -**

- <><><><><>

पेट्रोलच्या निर्यातीवर प्रति लिटर अतिरिक्त उत्पादन शुल्क तीन रुपयांनी वाढवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. पेट्रोलची निर्यात मोठ्या प्रमाणात होऊ नये यासाठी सरकारने हा निर्णय घेतल्याचं सांगितलं जात आहे. दुसरीकडे डिझेलच्या निर्यातीवरचं उत्पादन शुल्क प्रति लिटर २३ रुपयांवरून कमी करून १६ रुपये ५० पैसे इतकं करण्यात आलं आहे. अर्थ मंत्रालयाने काल प्रसारित केलेल्या अधिसूचनेत ही माहिती दिली. विमानाच्या इंधनावरचं उत्पादन शुल्कही कमी करून १६ रुपये ३३ पैसे करण्यात आलं आहे. हे दर आजपासून पुढील पंधरवड्यापर्यंत लागू असतील.

<><><><><>

सिक्कीम राज्य आज ‘स्थापना दिन’ साजरा करत आहे. १९७५ मध्ये राजेशाहीतून मुक्त होत सिक्कीमची राज्याची देशातलं २२ वं राज्य म्हणून स्थापना झाली. या निमित्तानं **राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू यांनी सिक्कीम राज्यातल्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. सिक्कीमचं भव्य नैसर्गिक सौंदर्य, समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि पर्यावरण संवर्धनाप्रती नागरिकांची असलेली दृढ वचनबद्धता यामुळे सिक्कीम हे राज्य शाश्वत विकासाचं आदर्श मॉडेल ठरतं, असं त्यांनी समाज माध्यमावर संदेश देताना म्हटलं आहे. तर भारताच्या विकासात सिक्कीमचं योगदान अभूतपूर्व आहे, अशा शब्दात सिक्कीम राज्याला ५० व्या

स्थापना दिनाच्या **प्रधानमंत्री** नरेंद्र मोदी यांनी प्रसार माध्यमांद्वारे शुभेच्छा दिल्या आहेत. सिक्कीम हे राज्य जगातलं पहिलं संपूर्ण सेंद्रिय राज्य असून पर्वतीय पर्यटनाला या राज्यानं नेहमीच नवी ओळख दिली आहे, असे गौरवोद्गार काढत केंद्रीय **गृहमंत्री** यांनी सिक्कीम वासियांना स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

दरम्यान, **उपराष्ट्रपती** सी. पी. राधाकृष्णन आज पदभार स्वीकारल्यानंतर त्यांच्या पहिल्या सिक्कीम दौऱ्यावर जाणार आहेत. गंगटोक इथं आज ते स्थापना दिनाच्या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. राज्यपाल ओम प्रकाश माथूर, मुख्यमंत्री प्रेम सिंह तामांग आणि इतर मान्यवर सोहळ्याला उपस्थित राहणार असल्याचं वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशात आज राष्ट्रीय डेंग्यू दिवस पाळला जात आहे. डेंग्यू आजाराबद्दल जनजागृती करणं आणि पावसाळ्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणं हे याचं उद्दिष्ट आहे. डासांची पैदास रोखण्यासाठी साचलेलं पाणी काढून टाकणं आणि पाणी साठवण्याच्या भांड्यांची स्वच्छता करणं यासारख्या प्रतिबंधात्मक उपायांना या दिवसानिमित्त प्रोत्साहन दिलं जातं. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय जुलै महिना डेंग्यू आजार प्रतिबंधात्मक माह म्हणून पाळणार असून या महिन्यात देशभरात जनजागृती तसंच प्रतिबंधात्मक उपाय राबवले जाणार आहेत.

**<><><><><>**

जनगणना २०२७ अंतर्गत महाराष्ट्रासह राज्यं आणि दिल्ली महानगरपालिका क्षेत्रात स्वगणनेचा कालावधी काल संपला आणि आजपासून घर यादी आणि गृहगणनेचा दुसरा टप्पा सुरू होत आहे. या टप्प्यांतर्गत, १६ मे ते १४ जून या कालावधीत प्रगणक माहिती संकलित करण्यासाठी किंवा नोंदवून घेण्यासाठी घरोघरी भेट देतील. सरकारनं अधिसूचित केलेल्या ३३ प्रश्नांची माहिती मोबाइल ॲप्लिकेशनद्वारे संकलित केली जाईल. ज्यांनी स्वगणना प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्यांच्या एसई आयडीद्वारे त्यांनी भरलेल्या माहितीची पडताळणी प्रगणक करतील.

**<><><><><>**

आज 'आंतरराष्ट्रीय प्रकाश दिन' साजरा होत आहे. 'शाश्वत भविष्यासाठी प्रकाश' ही यंदाची या दिनाची संकल्पना आहे. भौतिकशास्त्रज्ञ थिओडोर मेमन यांनी १९६० मध्ये

लेझरचा पहिला प्रयोग केला, त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी १६ मे हा दिवस ‘आंतरराष्ट्रीय प्रकाश दिन’ म्हणून साजरा केला जातो. प्रकाशाच्या अभ्यासानं पर्यायी ऊर्जा स्त्रोत, जीवनरक्षक वैद्यकीय साधनं, उपचार, तंत्रज्ञान आदी क्षेत्रांमध्ये प्रगती साधली आहे. त्या पार्श्वभूमीवर युनेस्कोनं वैज्ञानिक सहकार्य अधिक दृढ करण्याचं, तसंच शांतता आणि शाश्वत विकासासाठी प्रकाशाच्या शक्तीचा अधिकाधिक उपयोग करण्याचं आवाहन केलं आहे.

<><><><>

इस्त्रायल आणि लेबनॉन या दोन्ही देशांनी युद्धविराम आणखी ४५ दिवस वाढवण्यावर सहमती दर्शवली असल्याचं अमेरिकेने जाहीर केलं आहे. अमेरिकेमध्ये वॉशिंग्टन इथं झालेल्या चर्चेनंतर अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते टॉमी पिगॉट यांनी ही माहिती दिली. चर्चेची पुढची फेरी २ आणि ३ जूनला होणार आहे. या चर्चेमुळं दोन्ही देशांदरम्यान स्थायी शांतता प्रस्थापित होऊन एकमेकांच्या सार्वभौमत्वाला आणि प्रादेशिक अखंडतेला मान्यता मिळेल अशी आशा अमेरिकेला आहे असा पिगॉट यांनी म्हटलं आहे. दरम्यान, लेबनॉनमधे इराण-समर्थित सशस्त्र गट हिजबुल्लाच्या पायाभूत सुविधांवर इस्त्रायली हवाईदलाचे हल्ले सुरूच आहेत.

<><><><>

होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली जाईलच तसंच अमेरिका इराणला अण्वस्त्र तयार करू देणार नाही असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प यांनी इराणवर केलेल्या कारवाईचं समर्थन केलं तसंच जे योग्य आहे तेच करू असं ते म्हणाले. इराणसोबत सुरू असलेल्या वाटाघाटीबद्दल त्यांनी असमाधान व्यक्त केलं. इराण दरवेळी केलेल्या कराराचं उल्लंघन करतो असा आरोप ट्रम्प यांनी केला.

<><><><>

थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीने पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपान्त्य सामन्यात आज मलेशियाच्या नूर इझुद्दीन आणि गोह झे फेई या जोडीला त्यांनी १९-२१, २२-२०, २१-१६ अशा गुणफरकाने हरवलं. महिला एकेरीत पी.व्ही. सिंधूला उपांत्यपूर्व फेरीत जपानच्या, जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या अकाने यामागुचीकडून पराभव पत्करावा

लागला. तर लक्ष्य सेनला पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत थायलंडच्या कुन्लावुत विटिडसर्ननं पराभूत केलं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये, लखनौ सुपर जायंट्सनं काल चेन्नई सुपर किंग्सचा ७ गडी राखून पराभव केला. आज संध्याकाळी, कोलकात्यामधील ईडन गार्डन्सवर, कोलकाता नाईट रायडर्सचा सामना गुजरात टायटन्सशी होणार आहे.

//<><><><><>//